# दिवाळी अंकांची 'नेक्स्टजेन'

नीलेश बने

मराठी दिवाळी अंक यंदा शंभरीत आले... पण फक्त परंपरेच्या कौतुकात अडकून न बसता, मराठी दिवाळी अंकांनी अल्ट्रामॉडर्न, हायटेक भरारी घेतलीय. ऑनलाइन दिवाळी अंकांच्या माध्यामातून मराठी नेटीजनांनी इंटरनेटवर हे अक्षरदीप उजळले... आणि या समृद्ध परंपरेने नव्या युगात प्रवेश केला.

छापील दिवाळी अंकासोबत ऑनलाइन दिवाळी अंकही आता तुफान वाचले जाऊ लागलेत. त्याच्या लिंक्स ई-मेलमधून एकमेकांना फॉरवर्ड होताहेत... वेगवेगळ्या ब्लॉगवर आणि नेटवर्किंग साइटसवर त्यावर चर्चा रंगताहेत... चांगल्या साहित्यावर कौतुकाचा पाऊस पडतोय... तर टुकार प्रयत्नांना जोरदार टीकेला सामोरे जावं लागतंय.

...पण काहीही असले तरी, रोकड्या प्रतिसादाचा हा नवा पर्याय इंटरनेटवरील लेखकांना आवडू लागलाय. म्हणूनच ऑनलाइन दिवाळी अंकांची संख्या वर्षागणिक वाढतानाच दिसतेय. दरवर्षी त्यात नवनव्या ऑनलाइन दिवाळी अंकांची भर पडतेय. फक्त वाचायचा वार्षिक मजकूर एवढेच त्याचे स्वरूप मर्यादित न राहता, त्याला ऑडिओ-व्हिडिओचीही साथ मिळालीय. म्हणूनच शंभरीतले साहित्यसंचित आता अद्ययावत झालंय, असं म्हणता येईल.

**लिथोग्राफ ते पीडीएफ व्हाया 'खिडकी चित्र'**

का.र. मित्र यांनी १९०९ मध्ये लिथोग्राफ प्रिंटमध्ये छापलेल्या 'मनोरंजन'नंतर दिवाळी अंकांच्या परंपरेने अनेक महत्त्वाचे टप्पे अनुभवले. अनंत हरी गद्रे यांनी १९२२ साली 'मौज'चा पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला. खिडकी चित्रांसाठी फेमस अशा 'आवाज'ची सुरुवात मधुकर पाटकरांनी १९५१ मध्ये केली. श्रीधर अनंत एकबोटे यांनी १९५६ साली सुरू केलेला 'सुगंध' हा उत्कृष्ट दर्जेदार कथांसाठी प्रसिद्ध होता. चित्रकार दीनानाथ दलाल यांनी १९४४ मध्ये 'दीपावली'चा शुभारंभ केला. 'हंस', 'नवल', 'मोहिनी', 'धनुर्धारी' अशा अनेकांनी दशकामागून दशकं गाजवली.

हीच परंपरा नव्या जगाच्या कक्षेत नेण्याचा ध्यास मायबोली, महाराष्ट्र टाइम्स, उपक्रम, मनोगत अशा ऑनलाइन दिवाळी अंकांनी घेतलाय. ब्लॅक अँड व्हाइटपासून ग्लॉसी मल्टिकलर झालेली ही परंपरा या ऑनलाइन अंकांनी डिजिटल केलेय. 'रेषेवरची अक्षरे'सारखा अंक तर पीडीएफमध्ये इनबॉक्समध्ये येऊ लागला. त्यामुळे फक्त महाराष्ट्रातल्याच नाही तर नायजेरियाच्या लाओसमध्ये राहणाऱ्या मराठी माणसाची दिवाळीही आता दिवाळी अंकाशिवाय जात नाही.

**एका रुपयापासून चकटफू**

'मनोरंजन'ची किंमत होती एक रुपया. शंभर वर्षापूर्वी ही किंमत जास्त आहे, असे लोकांना वाटत होते. आज चांगले अंक ८० ते १०० च्या घरात गेलेत. सिनेमाच्या एका तिकिटाला दीडशे-दोनशे रुपये मोजणाऱ्यांना ही किंमत आजही जास्तच वाटते. पण वाचकांना इंटरनेटवरचे हे दिवाळी अंक वाचण्यासाठी अशी तक्रार करताच येत नाही. कारण बहुतेक सर्वच अंक चकटफू वाचता येतात.

**नव्या लेखकांची मांदिळाळी**

दिवाळी अंकांना मराठीला नवनवे लेखक दिले. अनेक लेखकांना तर आपले पहिले लिखाण हे दिवाळी अंकांसाठी केले आहे. हीच परंपरा ऑनलाइन दिवाळी अंकही पाळत असून, इंटरनेटच्या जगातले अनेक जण येथे लिहिते झालेले दिसतात.

युनिकोड तंत्रज्ञानामुळे मराठीत लिहिणे सोपे झाल्याने गेल्या काही वर्षांत अनेक मराठी ब्लॉग आणि वेबसाइट्स जन्माला आल्या. त्यात नियमित लेखन करणारे अनेक या दिवाळी अंकांमध्ये शब्दप्रावीण्य दाखवतात.

काळाच्या फिरणाऱ्या चाकांसोबत होणारी इतिहासाच्या पुनरावृत्तीची गंमत या ऑनलाइन दिवाळी अंकामध्ये पाहता येते. पूर्वी अनेक लेखक-कवी टोपणनावाने लेखन करत असत. आपली नवी ओळख निर्माण व्हावी तसेच मूळ ओळख लपवली जावी यासाठी टोपणनावाचा वापर होत असे. मध्यंतरी ती प्रथा लोप पावली. पण ऑनलाइन लेखनात पुन्हा टोपणनावांचा वापर वाढलेला आढळतो.

जरी टोपणनावाने लेखन होत असले तरी या साऱ्यांशी आपण ई-मेलद्वारे किंवा रिप्लाय पोस्ट करून संवाद साधू शकतो. ऑनलाइन माध्यमाची इंटरॲक्टिव्हिटी म्हणतात हीच. या टोपणनावांमुळे संवादही सोपा होतो. त्यात ना वयाचे बंधन राहत, ना देश वा स्त्रीपुरुष असण्याचे. म्हणूनच न्यूयॉर्कमधल्या आजी जस्मिन नावाने, १८ वर्षांच्या तात्यारावच्या लेखनावर बिनदिक्कत शेरा मारू शकतात!

**वेध मोबाइल दिवाळी अंकांचे**

दिवाळीला तुम्ही चकली-लाडू खात असताना, उद्या मोबाइलवर दिवाळी अंक आला तर आता आश्चर्य वाटायला नको. जग आता वायरलेस होत असून, जगभरातल्या सर्व इंटरनेट कंपन्यांनी मोबाइलसाठी वेगळी व्हर्जन काढण्यास सुरूवात केली आहे. भारतातही अनेक इंग्रजी वृत्तपत्रांनी आपली मोबाइल एडिशन लाँच केली आहे. त्यातच मोबाइल कंपन्या स्थानिक भाषेतून आपली सेवा देत आहेत. त्यामुळे अनेक मराठी वेबसाइट्स व्यवस्थित मोबाइलवर पाहता येतात. या साइटच्या मोबाइल एडिशन यायलाही आता फारसा वेळ नाही. त्यामुळे दिवाळी अंकांची ही परंपरा बघता बघता मोबाइलपर्यंत पोहोचेल.. आणि जाता-येता कुठेही दिवाळी अंक वाचता-ऐकता-पाहता येतील! ◆◆◆

nilesh.bane@timesgroup.com

ऑक्टोबर १९०९... काशिनाथ रघुनाथ मित्र यांच्या ग्रंथप्रसारक मंडळाने आपला 'मनोरंजन' हा १९२ पानांचा १ रुपया किमतीचा भरगच्च दिवाळी अंक मराठी वाचकाच्या हाती ठेवला... त्या ब्लॅक अँड व्हाइट लिथोग्राफ प्रिंटिंगपासून सुरू झालेली ही अस्सल मराठमोळी परंपरा आता ऑनलाइन दिवाळी अंकांपर्यंत आली आहे.

**यंदाचे नेटवरचे महत्त्वाचे दिवाळी अंक**

- महाराष्ट्र टाइम्स  
http://maharashtratimes.indiatimes.com/articlelist/3624506.cms
- मायबोली (हितगुज)  
http://www.maayboli.com/hitguj_diwali_ank/hda_2008/
- मनोगत  
http://www.manogat.com/diwali/2008/index.html
- रेषेवरची अक्षरे  
http://sites.google.com/site/reshewarachiakshare2008/?pli=1
- वेबदुनिया  
http://marathi.webdunia.com/miscellaneous/special08/diwalispecial/
- ई-सकाळ दीपोत्सव  
http://www.esakal.com/diwali08/index.html
- उपक्रम  
http://diwali.upakram.org/home
- सुरेश भट गजल विशेषांक  
http://www.sureshbhat.in/node/1032
- मायमराठी  
http://www.mymarathi.com/index.php?option=com_content&task=section&id=24&Itemid=126
- हास्यधमाका  
http://www.hasyadhamaka.blogspot.com/
- काव्यांजली  
http://kavyanjalideepotsav.multiply.com/













